# ऋणनिर्देश

माझ्या लघू शोधप्रबंधाचा विषय "कोल्हापूर जिल्हयाच्या कागल तालुक्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील स्वस्त धान्य दुकानांचा विशेष अभ्यास" हा आहे. या विषयावरील लघू शोधप्रबंध सादर करीत असताना मला खूप आनंद होत आहे. माझ्या या लघू शोधप्रबंधास पूर्णत्व येण्यासाठी बऱ्याच व्यक्तींनी मला प्रोत्साहन दिले. तसेच मदत केली, मार्गदर्शन केले. त्यांचे ऋण व्यक्त करणे हे माझे कर्तव्य समजतो.

माझ्या मार्गदर्शिका डॉ. सौ. पी. पी. कोळी यांचे प्रथम आभार मानले पाहिजेत. या लघूशोधप्रबंधाच्या लिखाणासाठी त्यांनी मला सतत प्रोत्साहन दिले. तसेच अत्यंत आपुलकीने निरपेक्षवृत्तीने आणि परखडपणे मार्गदर्शन केले. त्यांच्या बहुमोल मार्गदर्शन व सहकार्यामुळे मी हा लघू शोधप्रबंध पूर्ण करू शकलो. त्यामुळे मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

त्याचप्रमाणे अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. आर. जी. दांडगे, माजी विभाग प्रमुख प्रा. डॉ. पी. ए. कोळी, विभागातील इतर मान्यवर डॉ. पी. एस्. कांबळे, डॉ. सौ. व्ही. पी. कट्टी, डॉ. सी. एस्. भानुमते, संशोधन सहाय्यक श्री. अशोक साबळे व लिपिक श्री. एम्. जे. पाटील यांचीही मदत मिळाली. त्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

तसेच उद्योजक श्री. उदयसिंह शामराव चव्हाण यांनीही मोलाचे सहकार्य केले याबद्दल मी त्यांचा अंत्यत आभारी आहे. तसेच अभ्यासासाठी रास्त भाव दुकानांच्या संचालकांनी उत्तम प्रकारे माहिती देऊन सहकार्य केले; त्याबद्दल मी त्यांचाही आभारी आहे.

हा लघू शोधप्रबंध पूर्ण करीत असताना माझे मित्र प्रा. सचिन कांबळे, अर्जून लाखे, रमजान मुजावर, सचिन पाटील, समाधान बनसोडे यांच्या बहुमोल सहाकार्याबद्दल त्याचा मी अभारी आहे.

तसेच माझे आदरणीय वडील श्री. राजाराम तुकाराम खोत, आई सौ. लक्ष्मी राजाराम खोत, पत्नी संजीवनी यांचे नेहमी मानसिक पाठबळ मिळाले त्याबद्दल त्यांचा मी शतशः ऋणी आहे.

या लघू शोधप्रबंधाचे टायपिंग अचूक व सुबक करून त्यास असे मोहक रूप देऊन या लघू शोधप्रबंधाचे काम वेळेत पूर्ण करून दिल्याबद्दल मी श्री. गणेश कोरे यांचे आभार मानतो.

– श्री. एम्. आर. खोत